Module: 4

Cyber Psychology

# ऑनलाईन गुन्हे (घोटाळे, फसवणूक आणि बेकायदेशीर डाऊनलोड)

## Online Crimes (Scams, Fraud and Illegal downloads)

**डॉ. विनायक होनमोरे**

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

---

## 4.1 A) Phishing and Vishing:

I) Phishing:

II. Vishing:

1) Number of Victims: (बळींची संख्या)

**B) Why are people trickled by phishing?**

## 4.2 Mass- Marketing Fraud (MMF) मास मार्केटिंग लबाडी (फसवणूक) :

* बॉयलर करून किंवा गुंतवणूक घोटाळा
* ऑनलाइन डेटिंग रोमान्स स्कीम
* दान घोटाळे (चॅरिटी)
* आपत्कालीन घोटाळे
* वारसाहक्कांचे घोटाळे

**A) Cognitive and Motivational errors: बोधनिक आणि प्रेरणात्मक चुका**

**B) What type of person tends to be susceptible to MMF? : कोणत्या प्रकारच्या व्यक्ती MMF ला बळी पडू शकतात?**

**The role of Internet: इंटरनेटची भूमिका:**

## 4.3 Stages involved in the Online dating romance scam: ऑनलाईन प्रणयी फसवणुकीतील टप्पे-

## 4.4 Illegal Downloads: बेकायदेशीर डाउनलोड :

**प्रस्तावना :**

ऑनलाईन फसवणूक ही आजच्या काळात फार मोठी समस्या आहे. दैनंदिन जीवनामध्ये फसवणूकीकरिता कशा पद्धतीने संभाषण साधले जाते. गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी व्यक्ती कशा पद्धतीने खोटे बोलून इतरांची फसवणूक करते, यासाठी कोणत्या युक्त्या वापरते हे पाहणे महत्त्वाचे ठरते. या प्रकरणांमध्ये आपण प्रामुख्याने Phishing, Mass-Marketing frauds आणि Illegal downloads याचा प्रामुख्याने विचार करणार आहोत.

## 4.1 A) Phishing and Vishing:

### I) Phishing:

तांत्रिक क्लुप्त्या व सामाजिक अभियांत्रिकीचा वापर करून व्यक्तीच्या व्यक्तिगत तसेच आर्थिक माहिती उपलब्ध करून घेण्याच्या उद्देशाने व्यक्तीचे खाते(Account) हस्तगत करण्याच्या उद्देशाने वापरलेले युक्ती म्हणजे फिशिंग होय. याची सुरुवात ही एखाद्या प्रसिद्ध तसेच विश्वासहार्य संघटनेद्वारे कथितरित्या पाठवलेला ई-मेल द्वारे होते. अशा संदेशामध्ये आपली माहितीची खातरजमा करून घ्यायची आहे तेव्हा अशा प्रसिद्ध कंपनीच्या वेबसाईटवर जावून अथवा पाठवलेल्या संदेशाद्वारे आपण माहिती भरावी अशी गळ घातली जाते. यासाठी पाठवली जाणारी लिंक ही अधिकृत असत नाही. अशा लिंक वरती क्लिक केल्यानंतर त्यासारख्या दिसणाऱ्या पण खोट्या अथवा प्रतिकृती असणाऱ्या वेबसाईटवर तुमचा प्रवेश होतो. आपणास ती वेबसाईट अधिकृत वाटत असल्याने साहजिकच आपली गोपनीय माहिती भरली जाते. आपल्या मोबाईल, लॅपटॉप अथवा इतर प्रणालीमधील महत्वाच्या माहितीपर्यंतचा संपर्क या व्यक्तींना प्राप्त होतो. ज्याचा वापर फसवणुकीकरिता केला जातो. अशा प्रकारचे हल्ले मोठ्या प्रमाणात केले जातात याचा यालाच फिशिंग असे म्हटले जाते. एखादा मच्छिमार ज्याप्रमाणे मासेमारीच्या उद्देशाने जाळे पसरतो अगदी त्याप्रमाणे काही प्रलोभने, आमिषे सादर करून काही व्यक्ती तरी यामध्ये आडकाव्यात या उद्देशाने सापळा रचला जातो.

डिसेंबर २०१४ मध्ये जवळपास १७.३२० खोट्या (फसव्या) Phishing वेबसाईट असल्याचे Anti-Phishing Working Group यांच्या निदर्शनास आले. याकरिता ३०० प्रख्यात उत्पादनांना लक्ष करण्यात आले होते. यामध्येही किरकोळ अथवा घाऊक व्यापार करणारे उद्योगधंदे (२९.४%), देयक अदा करणाऱ्या सेवा (२५.१%) व आर्थिक सेवा पुरवणारी क्षेत्रे (२०.८%) इत्यादीचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होता. सध्याच्या आधुनिक प्रणालीमुळे अशा फसव्या साईटस एका दिवसाच्या आत बंद करण्यात आल्या. तथापि याची वाढती संख्या पाहता अशी संकेतस्थळे मोठी समस्या बनत चालल्याचे निदर्शनास येत आहे. याचे अस्तित्व हेच अधोरेखित करते आहे की, गुन्हेगार अद्यापही याच्या आधारे लोकांची फसवणूक करण्यामध्ये यशस्वी ठरत आहेत.

फिशिंगच्या जोडीला आणखी एक पद्धती वापरली जाते म्हणजे Spear Phishing. यामध्ये विशिष्ट व्यक्तीवर लक्ष केंद्रित केले जाते. फिशिंगमध्ये मोठ्या समूहाला लक्ष केले जाते. Spear Phishing मध्ये मात्र एखाद्या व्यक्तीकडून गोपनीय माहिती हस्तगत केली जाते. याची सुरुवात देखील फिशिंग प्रमाणे एखाद्या विश्वासहार्य स्त्रोताकडून होते. तथापि यामध्ये मात्र एखादी व्यक्ती अथवा संघटना इत्यादी विषयीची विशिष्ट माहिती अथवा ज्ञानावर आघात केला जातो. याविषयी एक उदाहरण Hong यांनी दिले. यामध्ये एखाद्या लष्करी सेवकास एखाद्या सेवानिवृत्तीपर आयोजित पार्टीचे निमंत्रण पाठविणारा संदेश पाठविला जातो. आपण उपस्थित राहणार आहात की नाही याची पुष्टी करण्याकरिता एखाद्या लिंकला क्लिक करण्यास सांगितले जाते. इथे एखाद्या सर्वसाधारण फिशिंग अॅटॅक च्या तुलनेत या विशिष्ट हल्ल्यास प्रतिक्रिया देण्याची शक्यता तोडणे अधिक असते.

### II. Vishing:

सध्या आपण नवनवीन घोटाळ्यांना सामोरे जात आहोत. तसेच गुन्हेगार देखील माध्यमांचा प्रभावी वापर करून आपला खरेपणा पटवून देण्यासाठी नवनवीन युक्त्यांचा वापर करीत असताना दिसून येतात. फिशिंग मध्ये गुन्हेगार दूरध्वनीचा वापर करून व्यक्तीची व्यक्तिगत माहिती प्राप्त करून त्या ओळखीचा वापर करून विविध घोटाळे करीत आहेत. आपण कायदेशीर तसेच वैध व्यवहार करीत आहोत. परिणामी वैध कारणास्तव आपल्या व्यक्तिगत माहितीची गरज असल्याचे भासवले जाते. दुसऱ्या प्रकारामध्ये गुन्हेगार इतर व्यक्तीस त्यांची व्यक्तिगत माहिती वेबसाईटवर टाकण्यास अथवा त्यांचे पैसे इतर खात्यामध्ये वळविण्यास तयार करण्यामध्ये यशस्वी ठरतात. आपण आपली माहिती, खाती सुरक्षीत करीत आहोत अशी व्यक्तीची धारणा असते परंतु प्रत्यक्षात ही फसवणूक असते.

**1) बळींची संख्या (Number of Victims) :**

अंतिम अथवा शेवटची वापरकर्ती व्यक्तीची फसवणूक होऊ नये याकरिता अनेक प्रशिक्षण कार्यशाळा, जागृती अथवा जागरुकता कार्यक्रम इत्यादींचे आयोजन करून देखील अनेक व्यक्ती अशा प्रकारच्या फसवणुकीस बळी पडतात. २०१५ मध्ये कॅनडातील

शासनाने एक सर्वेक्षण केला त्यानुसार जवळपास १०% नागरिक यास बळी पडत असल्याचे निदर्शनास आले. तर युनायटेड किंगडम मध्ये २०१४ ला Verizon जवळपास २५% कर्मचाऱ्यांनी फिशिंग मेल उघडल्याचे अथवा पाहिल्याचा दावा केला.

**Activity:**
तुम्हाला प्राप्त झालेले फिशिंग मेल काळजीपुर्वक वाचा. त्यामधील कोणत्या गोष्टींमुळे ते तुम्हास खरे अथवा विश्वसनीय वाटतात? ती मेल खोटे आहेत ही ओळखण्याकरिता कोणती वैशिष्ट्ये, सुचके तुम्हास मदतगार ठरतात?

**B) Why are people trickled by phishing?**

फिशिंग मेल हे खरे आहेत विश्वसनीय आहेत असा विश्वास बळी पडणाऱ्या व्यक्तींना असतो. या पाठीमागची कारणे शोधण्याचा प्रयत्न काही संशोधकांनी केला. वॅग व सहकारी (२०१४) यांनी याविषयी एक संशोधन केले. ज्यामध्ये सहभागी प्रयुक्तांना 'Upgrade your mail account now' असा फिशिंग मेल पाठवला. या मेलमध्ये व्यक्तींना युजरनेम, पासवर्ड, जन्मदिनांक, सुरक्षितता प्रश्न व त्यांचे उत्तराविषयी विचारणा केली होती. संबंधित व्यक्तीने सदरची माहिती सात दिवसाच्या आत न भरल्यास अशा सदरच्या व्यक्तीस तिचे ई-मेल खाते गमवावे लागेल. सहभागी प्रयुक्तांना प्रश्नांची शृंखला सादर केली जी त्यांनी भरून द्यायची होती. यातून त्यांना असे लक्षात आले की व्यक्तीची अंतरिक उद्दीपने उद्दीपित करणारी सुचके जसे प्रतिक्रिया या तात्काळ देणे गरजेचे आहे यावर दिला जाणारा जोर व्यक्तीस प्रतिक्रिया देण्यास प्रवृत्त करतो याउलट दोषपूर्ण संभाषण, लिहण्यातील चुका, पत्ता, लिहण्यातील चुका इत्यादींमुळे प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी होते. याचबरोबर हा मेल खरा की खोटा याविषयी खर्च होणाऱ्या बोधनिक प्रयत्नांचा आणि प्रतिसाद देण्याच्या शक्यता लक्षणीयरीत्या एकमेकाशी संघटित नव्हत्या.

Alsharnouby व सहकारी (२०१५) यांनी व्यक्ती फिशिंग घोटाळ्यांमध्ये कशी अडकते हे समजून घेण्यासाठी काही प्रयुक्तांना वेबसाईटची शृंखला (ज्यामध्ये१४ फिशिंग व ११ खऱ्या) सादर केल्या. प्रयुक्तांनी प्रत्येक वेबसाईट काळजीपूर्वक पाहून सदर वेबसाईट वैध आहे की फसवणूक करणारी खोटी वेबसाईट आहे. ते याविषयी कितपत खात्रीशीर आहेत त्याची टक्केवारी. तसेच याविषयी निर्णयापर्यंत पोहोचले याविषयी विचारले. तसेच सहभागी प्रयुक्तांच्या डोळ्यांच्या हालचालींची नोंद घेण्याकरिता त्यांना eye tracker उपकरण परिधान करावे लागे. याद्वारे संशोधकांच्या असे लक्षात आले व्यक्ती क्रोम सारख्या ब्राउजरच्या सुरक्षितता सूचकांकडे जेवढा अधिक लक्ष पुरवतात तेवढी सुरक्षितता सुचके लक्षात येतात. अन्यथा या गोष्टीचा फारसा प्रभाव पडत नाही.

फेसबुकचा वापरआणि फिशिंग हल्ल्यास बळी पडण्याची शक्यता यामधील सहसंबंध तपासण्याचा प्रयत्न विश्वनाथ (२०१५) यांनी केला. विश्वनाथ यांच्या मते, ई-मेल च्या माध्यमातून केलेला फिशांग ॲटॅक च्या तुलनेत समाजमाध्यमे जसे की फेसबुकच्या द्वारे केलेले हल्ले अधिक यशस्वी होतात. हे यशस्वी होण्याचे कारण म्हणजे या समाज माध्यमांची वापराची प्रणाली, इंटरफेस, कार्यशीलता तसेच वापरकर्त्यांची सुरक्षितता या गोष्टी सातत्याने बदलत असतात. परिणामी, उपभोकत्यास वापरत असणाऱ्या माध्यमावर प्राविण्य प्राप्त करण्यात अडचणी निर्माण होतात. समाज माध्यमावर होणारे फिशिंग हल्ले हे दोन टप्प्यांमध्ये होतात. पहिल्या टप्प्यामध्ये वापरकर्त्यास अथवा उपभोक्त्यास मैत्रीच्या विनंतीचा (Friend request) स्वीकार करावा लागतो. जेव्हा या पहिल्या टप्प्यावर व्यक्ती समोरच्या व्यक्तीची विनंती स्वीकारते. त्याक्षणी गुन्हेगारास आपण आपल्या माहितीच्या खजिना खुला करून देत असतो. हल्ल्याच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये गुन्हेगार समाजमाध्यमांच्या संदेश प्रणालीचा वापर करतात. याद्वारे त्यांना विनंतीचा समावेश असणारे संदेश पाठवले जातात. जसे की, समजा एखाद्या व्यक्तीस कुत्र्यावर, पाळीव प्राण्यावर जीव असेल तर अशा व्यक्तींना कुत्र्यांच्या संगोपन व पुनर्वसनाकरिता आपण सढळ हाताने मदत करावी अशा आशयाचे संदेश पाठवले जातात. व्यक्ती जेव्हा अशा लिंक ला क्लिक करते. तेव्हा यामध्ये लपलेले व्हायरस व सांकेतिक भाषांना आपल्या इतर संदेशाचा वापर करण्याची मुभा (परवानगी) मिळते. याचाच अर्थ आपला सवयींचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर समाज माध्यमांचा वापर, मोठे सामाजिक संपर्क क्षेत्र असणे आणि आपल्या स्वतः वर्तनावर नियंत्रण नसणे या सर्व वर्तनाच्या आधारे आपण समाज माध्यमाद्वारे अशा हल्ल्यांचे बळी ठरू ठरतो. याचे भाकीत करता येते. ई-मेल च्या तुलनेत समाज माध्यमाद्वारे केले जाणारे हल्ले अधिक यशस्वी होतात हे विश्वनाथ यांनी स्पष्ट केले तरीही कोणत्या प्रकारच्या व्यक्ती ह्या ई-मेल च्या हल्ल्यास अधिक संवेदनक्षम आहेत याविषयी देखील त्यांनी अभ्यास केला. यामध्ये त्यांनी काही विद्यार्थ्यांना ई-मेल बंद केले जाणार असल्याचे तसेच सुरू ठेवायचे झाल्यास निर्धारित वेळेत दिलेल्या लिंकला क्लिक करण्याचे सांगितले गेले. या लिंक ही एक छुपी हायपरलिंक जोडली होती. ज्यांनी या लिंक ला क्लिक केले नाही. त्यांच्यासाठी आठवड्याने पुन्हा आठवणीचा संदेश पाठविला जवळपास ८३% प्रयुक्तांनी दिलेल्या लिंक वर क्लिक केले. विश्वनाथ यांच्यामते ई-मेल वापरण्याची सवय अथवा ती वापरावी याचा दबाव आणि बोधनिक प्रक्रियन या दोन्हीद्वारे व्यक्ती फिशिंग ई-मेलला बाई पडेल की नाही याचे याचीकथन करता येते. याचबरोबर सद्सदविवेकता आणि नसविकृती (भावनिक अस्थिरता) यासारख्या व्यक्तिमत्व घटकांचा सुरक्षितपणे ई-मेल वापरण्याच्या सवयीशी जवळचा संबंध आहे. ज्या व्यक्ती आपल्या सवयीचा भाग म्हणून वारंवार ई-मेल तपासतात त्या व्यक्ती बळी पडण्याची शक्यता अधिक असते. बोधनिक आडमार्ग अथवा युक्त्याशी निगडित असणाऱ्या नवगामी प्रक्रियनाचा वापर हा बळी पडू याची शक्यता वाढवतो. इथे प्राप्त ई-मेल ची खातरजमा न करता आलेला संदेश हा खऱ्या स्त्रोताकडून आला आहे यावर विश्वास ठेवला जातो. याउलट पधतशीर

प्रक्रियनामध्ये बळी पडण्याची शक्यता कमी करतो. एकंदरीतच ई-मेल सवयी हा घटक बळी पडण्याच्या भविष्य कथनांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. याला पायबंद घालायचा झाल्यास आपणास आपल्या सवयींवर अधिक लक्ष ठेवून त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

**Activity**:

तुमच्या ई-मेल वापरण्याच्या सवय गृहीत धरता त्यामध्ये बदल करायला हवा असे तुम्हास वाटते का? या सवयी बदलण्याकरिता कोणते प्रशिक्षण कार्यक्रम आखता येतील?

## 4.2 मास मार्केटिंग लबाडी (फसवणूक) (Mass- Marketing Fraud - MMF) :

'एखादी व्यक्ती संघटनेचा आर्थिक दृष्टीने अप्रमाणिक फायदा घेण्याच्या उद्देशाने वापरल्या जाणाऱ्या युक्त्या म्हणजे फसवणूक अथवा लबाडी होय. मास मार्केटिंग लबाडी ही संप्रेषणाची अनेकविध तंत्रे जसे ई-मेल, संदेश दळणवळण, गठ्ठा संदेश पाठवणे, समाज माध्यमे यासारख्या अनेक तंत्रांचा वापर करून केली जाते. अशा प्रकारच्या गाण्यांमधून प्राप्त झालेल्या पैशाचा वापर आतंकवाद मादक पदार्थांची तस्करी यासारख्या गंभीर गुन्ह्याकरिता वापरला जातो असा अंदाज आहे.

नायजेरिया मध्ये एक मोठी फसवणूक उघडकीस आली ज्याला 'अग्रिम शुल्क घोटाळा' किंवा '419 घोटाळा' म्हटले गेले. याची सुरुवात मेल द्वारे झाली. अधिकतर केसेस बाबतीत पाठवलेला मेल हा आफ्रिकन देशांमधून आलेला होता. अनेकविध कारणांनी जो निधी हा अडकलेला आहे अथवा गोठवला गेला आहे तो प्राप्त करण्याच्या उद्देशाने काम होण्यापूर्वी पैशाची मागणी केली जाते. अग्रिम शुल्क घोटाळा हा याच्याशी निगडीत आहे. या सर्व प्रकरणांमध्ये शासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता आपणास मोठे (श्रीमंत) बक्षीस दिले जाईल असे आमिष दाखवले जाते. ज्या व्यक्ती या मेल ना प्रतिक्रिया देतात त्यांना हळूहळू पैशाच्या व्यवहाराच्या अडचणी जाणवायला लागतात. मग कागदपत्रांच्या पूर्तीबाबत दिरंगाई केली जाते. नंतर काही कारणे सांगून पैशाची गरज असल्याचे सांगितले जाते. जसे संबंधित अधिकाऱ्यास एवढी लाच द्यावी लागेल इ. तुम्हाला प्राप्त होणाऱ्या रकमेच्या तुलनेत आपण आधी देत असणारी रक्कम ही नगण्य असल्याचे सांगितले जाते व पैशाची मागणी वारंवार केली जाते. नेहमीप्रमाणे दिरंगाई होत राहते व पैशांची मागणी केली जाते. इथवर आल्यामुळे आता नाकारणे हे त्यांच्या दृष्टीने शक्य नसते. आधीच त्यांना आपला बराचसा पैसा गुंतवलेला असतो. हे घोटाळे तेव्हाच थांबतात अथवा बंद होतात जेव्हा यास बळी पडलेल्या व्यक्तीस आपली फसगत झाल्याची जाणीव होते. इंटरनेटमुळे MMF हे निम्न मुलांचे आहे. काहींना मोठ्या प्रमाणात बळी पडणाऱ्याची संख्या आहे
तर काहीमध्ये प्रणयी, व्यवसायिक, मैत्रीयुक्त अशा नातेसंबंधाच्या विकासातून नंतर पैशाची मागणी अथवा फसवणूक केली जाते. यामध्ये देखील अनेक व्यक्तींना लक्ष केले जाते. MMF ची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे:

**<u>* बॉयलर करून किंवा गुंतवणूक घोटाळा</u>**:

यामध्ये गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीस आपणास अल्पावधीत मोठी रक्कम मिळणार असल्याची खात्री दिली जाते. घोटाळे बाहद्दर सावजाशी संपर्क साधतात व निरुपयोगी, अधिक किंमतीचे किंबहुना अस्तित्वातच नसणारे समभाग (शेअर्स) विकतात. यामागची प्रेरणा हीच असते की याद्वारे आपणास अधिक फायदा होणार आहे.

**<u>* ऑनलाइन डेटिंग रोमान्स स्कीम:</u>**

या घोटाळ्यांमध्ये अथवा गुन्ह्यांमध्ये, गुन्हेगार ऑनलाईन डेटिंग साईटच्या माध्यमातून सर्वप्रथम प्रणयी नातेसंबंधांची सुरुवात करतो आणि बळी पडणाऱ्या व्यक्तीस मोठ्या रक्कमेकरिता फसवितो. दीर्घकालीन प्रणयी नात्याच्या आमिषाने व्यक्तीची फसवणूक केली जाते. यामध्ये २०१२ नंतर आणखीन एक प्रकाराचा अंतर्भाव झाला. यामध्ये व्यक्ती अश्लिल वर्तन करीत असल्याचे चित्रीकरण केले जाते. ज्याचा वापर भविष्यामध्ये त्याच्याकडून पैसे वसूल करण्याकरिता केला जातो. सदर व्हिडिओ त्याच्या प्रियजनांना अथवा कामाच्या ठिकाणी दाखवू अशी धमकी देऊन बदनामीची भीती घातली जाते. व त्याआधारे पैसे उकळले जातात.

* <u>दान घोटाळे (चॅरिटी) :</u>

यामध्ये खरीखुरी वाटणाऱ्या दान योजनेच्या आधारे पैशाची आफरातफर केली जाते. असे घोटाळे करणाऱ्या व्यक्ती आपण एखाद्या कायदेशील बड्या दानधर्म करणाऱ्या संख्येचे प्रतिनिधी आहोत असे भासवतात अथवा स्वतःचीच बनावट संख्या उभी करतात. दानधर्म करणाऱ्या संस्थेप्रमाणेच किंवा त्यांच्या सारखी वेबसाइटची निर्मिती करतात. यामध्ये फायद्याचा अथवा नफा तोट्याचे आमिष न दाखवता आपण दिलेला पैसा सत्कर्णी लागेल, इतरांच्या मदतीला उपयोगी येईल अशी धारणा निर्माण करून पैसे घेतले जातात.

*** आपत्कालीन घोटाळे (Emergency):**

यामध्ये एखाद्या व्यक्तीची खरी माहिती इंटरनेटद्वारे प्राप्त केली जाते. व त्या व्यक्तीच्या संपर्क क्षेत्रातील (यादीतील) एक अथवा अनेक व्यक्तीशी संपर्क साधला जातो व आपली ओळखीच्या व्यक्तीचा अपघात झाला आहे अथवा ही परदेशात अडचणीत सापडली असल्याने तिला तात्काळ पैशाची गरज आहे असे सांगितले जाते. परिणामी पैसे भरण्याची सूचना केली जाते. आपल्या प्रियजनांना मदत केली जावी ही यापाठीमागची प्रेरणा असल्याने इतर घोटाळयांच्या तुलनेत हे घोटाळे अधिक गतीने कार्यरत होतात, यशस्वी होतात.

*** वारसाहक्कांचे घोटाळे:**

या घोटाळयामध्ये गुन्हेगार व्यक्ती आपण वकील असल्याची बतावणी करते व धनाढ्य व्यक्ती मृत पावली आहे. त्यांनी त्यांचे समभाग तुमच्या कुटुंबाच्या नावे केले आहेत अथवा तुमचे आणि त्यांच्या नावांमध्ये साधर्म्य आहे. जोवर वकिलास त्याच्या कुटुंबातील सदस्यांची ओळख पटत नाही तोपर्यंत ते पैसे तुम्हास मिळणार नाहीत. अन्यथा सदर मालमत्ता सरकार दरबारी जमा होईल. तुम्हाला हे पैसे हवे असल्यास यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता हवे असणारे शुल्क, कायदेशीर शुल्क, वकिलाचे शुल्क, कर आधी भरावा लागेल. असे सांगून व्यक्तीकडून पैसे उकळले जातात. अशा प्रकारच्या गुन्ह्यांची तपासणी अवघड असते.

प्राप्त अहवालानुसार असे लक्षात येते की, अधिकतर व्यक्ती अथवा आपले प्रियजन किंवा नातेवाईक MMF नी प्रभावित झाले आहेत. युनायटेड किंगडमच्या The National Fraud Authority (२०१२) नुसार जवळपास ७८ बिलियन पाऊंड इतक्या मोठ्या रकमेचा घोटाळा दरवर्षी होतो. ज्यामध्ये फक्त २०११ मध्ये ३.५ बिलियन पाऊंड इतकी रक्कम MMF मध्ये गमावली होती. The National Fraud Authority यांनी UK मध्ये जवळपास ४००० प्रौढांचा प्रातिनिधिक अभ्यास केला. यामध्ये जवळपास एक मिलियन व्यक्ती अशा संदिग्ध ई-मेल प्रतिसाद देण्याच्या निमित्ताने पैसे पाठवण्याचे निदर्शनास आले. याचबरोबर १/३ UK प्रौढांना म्हणजेच ३७ मिलियन व्यक्तींना अशा प्रकारचे मेल प्राप्त झाल्याचे स्पष्ट झाले. यासारखाच अभ्यास २०१२ मध्ये Whitty यांनी २००० प्रौढाच्या प्रातिनिधिक समूहावर केला. यामध्ये असे स्पष्ट झाले की MMF च्या द्वारे ८,००,००० प्रौढांची फसवणूक झाली होती. २०१० मध्ये UK Office of Fair Trading यांच्यामते जवळपास निम्म्या UK प्रौढांना अशा घोटाळयाकरिता लक्ष केले होते तसेच आठ टक्के व्यक्तींना त्यांच्या आयुष्यभरात एकदा का होईना लक्ष केले होते. Whitty आणि Buchanan (२०१२) यांना 230000 व्यक्तींची ऑनलाइन डेटिंग रोमान्स याद्वारे फसवणूक झाल्याचे दिसून आले. वरील सर्व आकडेवारी पाहता MMF चे गांभीर्य लक्षात येते

बऱ्याचदा लज्जेमुळे, खजिल झाल्यामुळे MMF घोटाळयांची तक्रार नोंदवली जात नाही. तसेच कायद्याचे पालनकर्ते, तपासकर्ते या गुन्ह्यांचा तपास गांभीर्याने करतील की नाही, गुन्हेगार सापडतील की नाही या विचाराने देखील तक्रारी नोंदवल्या जात नाहीत. तक्रार निवारण संस्थांच्या मते अशा घोटाळयांपैकी केवळ १०% व्यक्तीच अशा प्रकारच्या गुन्ह्याची तक्रार नोंदवतात. Internet Crime Complaint Center यांच्यानुसार सुद्धा १०% व्यक्तीच अशा फसवणुकीच्या तक्रारी नोंदवतात.

MMF ला बळी पडलेल्या व्यक्तींना आर्थिक तसेच मानसशास्त्रीय आघातांना सामोरे जावे लागते. अनेकदा झालेले आर्थिक नुकसान हे मोठे असते. ज्याचा मानसशास्त्रीय प्रभाव हा त्याहूनही मोठा असतो. या मानसशास्त्रीय अघातांमध्ये शरम वाटणे, अपराधीपणा, गोंधळ, खजील होणे, अवसाद, आत्महत्येचे विचार, शोक, चिंता, विश्वास ठेवण्यात अडचणी येणे इत्यादींचा अंतर्भाव होतो. इतर गुन्ह्यांना बळी ठरलेल्या व्यक्ती या देखील अशा व्यक्तींना पाठिंबा मिळत नाही. कारण झालेल्या नुकसानीस ती व्यक्ती स्वतः जबाबदार असल्याची त्यांची धारणा असते. गुन्ह्याविषयीच्या माहितीचा अथवा आकलनाचा अभाव यामुळे देखील अशा व्यक्तींना समाजाचा, कुटुंबाचा, मित्रांचा पाठिंबा मिळत नाही.

MMF गुन्हेगारांना जेरबंद करणे व त्यावर खटला चालवणे ही अशक्यप्राय अथवा अवघड गोष्ट आहे. याची तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे असे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगार व्यक्ती या बळी ठरलेल्या व्यक्तीच्या देशाचे नागरिक नसून ते इतर देशाचे रहिवासी असतात. दुसरे म्हणजे गुन्ह्यकरिता ज्या पद्धतीचा वापर गुन्हेगार करतात त्यांचा तपास करणे, अथवा मागोवा काढणे अवघड होते. तिसरे कारण म्हणजे याविषयीचा खटला चालू ठेवण्याची क्रिया अधिक वेळखाऊ आहे. कामकाजातकरिता मोठ्या प्रमाणात ऑनलाईन माहितीचे विश्लेषण करावे लागते. गुन्ह्याची पद्धती, कार्यप्रणाली याविषयी स्वतः अंतर्दृष्टी प्राप्त करावी लागते. वरील घटकांचा विचार करता अशा प्रकारचे गुन्हे रोखण्याकरिता अथवा शोधण्याकरिता नाविन्यपूर्ण पद्धतीची गरज भासते. उदा. डेटिंग साईटसनी ग्राहकांना माहिती असणाऱ्या खोट्या प्रोफाईलची माहितीची देवाणघेवाण करण्यास सांगितले. जेणेकरून अशा प्रकारचे गुन्हे कमी करण्यास मदत होईल. अशा प्रकारचे खोटे प्रोफाइल कमी करण्याचा प्रयत्न फेसबुकनी सुद्धा केल्याचे दिसून आले. वेस्टर्न युनियन आणि मनीग्राम यासारख्या पैशांच्या देवाणघेवाणी करणाऱ्या कंपन्यांच्या माध्यमातून जेव्हा पैशांची देवाणघेवाण होते. त्यावेळी पाठविणारा व पैसे घेणाऱ्याची ओळख पटावी याकरिता Anti-money-laundering (AML) कायद्यांचा उपयोग होतो.

**A) बोधनिक आणि प्रेरणात्मक चुका (Cognitive and Motivational errors) :**

असे म्हटले जाते की, व्यक्ती जेव्हा एखाद्या फसवणुकीस बळी पडते तेव्हा तिच्या निर्णयक्षमतेमध्ये चुका होत असतात. फसवणूक करणारी व्यक्ती स्थितींची निर्मिती करत असते. संबंधित व्यक्ती अशा प्रकारच्या योजना आणते ज्यामुळे व्यक्तीमध्ये निर्णय क्षमतेमध्ये कमतरता येते. एखाद्या विशिष्ट घटकांबाबत असणारा अतिविश्वास (बोधनिक घटक) आणि धनात्मक भावना निर्माण करणारे घोटाळे (प्रेरणात्मक घटक) या प्रक्रिया व्यक्ती अशा घोटाळ्यांना का बळी पडतात हे स्पष्ट करतात. व्यक्ती बळी पडण्याठी महत्त्वाचे कारण म्हणजे यामध्ये विश्वास आणि अधिकारी व्यक्ती याद्वारे केलेले आवाहन. अशा घोटाळयांमध्ये विश्वासहार्य व्यक्ती अथवा संस्थांचा वापर केला जातो जेणेकरून हे घोटाळे कायदेशीर वाटावेत. विश्वास आणि अधिकार याबरोबरच शारीरिक म्हणजेच आंतरिक उद्दीपनांना उद्दीपित करणारी सुचके जसे बळी पडणाऱ्या व्यक्तींचे लक्ष मोठी बक्षीसे व भविष्यातील सुखद तसेच धनात्मक भावनिक स्थितीची कल्पना यांचा समावेश असतो. आणखी एक चूक घडते ती म्हणजे बळी पडणाऱ्या व्यक्तीस वाटत असते अथवा त्याचा विश्वास असतो की आपण सामाजिक मानदंडानुसार वर्तन करीत आहोत. ह्या मानदंडाची निर्मिती आपला सामाजिक ज्ञानावर आधारित असते. MMF च्या बाबतीत सर्वसाधारण पणे कोणकोणत्या बोधनिक व प्रेरणात्मक चुका घडतात याची यादी पुढीलप्रमाणे:

प्रेरणात्मक चुकांमध्ये आंतरिक इंद्रियांची उद्दीपने, अथवा प्रभाव, माहिती घेण्याची प्रेरणा कमी होते. खात्री करण्याची वृत्ती कमी होते. स्व- नियंत्रणाचा अभाव, भावभावना नियंत्रण, आभासात्मक स्थितीची निर्मिती, संवेदन क्षमता, आवड आणि सारखेपणा, परस्परपूरकता, बांधिलकी आणि सातत्य. तर बोधनिक चुकांमध्ये प्रामुख्याने बोधनिक क्षमतांमध्ये कमतरता येणे, धनात्मक भ्रम, अवांतर ज्ञान, अतिविश्वास, मानदंड हे कार्यान्वित होणे, अधिकारीत्व, सामाजिक पुरावा इ. समावेश होतो.

**B) कोणत्या प्रकारच्या व्यक्ती MMF ला बळी पडू शकतात? (What type of person tends to be susceptible to MMF?) :**

बोधनिक प्रक्रियेबरोबरच कोणत्या प्रकारच्या व्यक्ती ह्या अधिक प्रमाणात MMF घोटाळयास बळी पडू शकतात याचीही संशोधकांनी तपासणी केली आहे. संशोधकांच्या मते लोभी, हव्यासी तसेच भाबड्या व्यक्तींना फसवणे अधिक सोपे असते असे तर फरनेल (२००५) यांचे मत आहे. Lee आणि Soberon- Ferrer (२००५) यांच्या असे लक्षात आले की, अशा घोटाळयांना बळी पडणाऱ्या व्यक्ती ह्या अधिक वयाच्या गरीब, एकट्या, तसेच अल्पशिक्षित असतात. Holtfreter, Reisis and Pratt (२००५) यांनी 'ग्राहकांच्या घोटाळयांकडे' अधिक व्यापक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या निदर्शनास आले की, बळी पडलेल्या व्यक्तींचे स्वतःवर अतिशय अल्प नियंत्रण होते. याउलट Buchanan and Whitty (२००५) यांनी ऑनलाईन प्रणयी घोटाळयांबाबत अवधान खेचण्याचा अथवा संवेदनाबाबत अधिक सजग असणाऱ्या व्यक्तींना फसवणे अवघड असते. याचबरोबर आदर्श प्रेमाविषयीच्या प्रणयी विश्वास असणाऱ्या व्यक्ती अधिक प्रमाणात बळी पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घोटाळयास बळी पडणाऱ्या व्यक्तींचे काही सर्वसाधारण आकृतीबंध पहावयास मिळतात. उदा. तात्कालिक किंवा आपत्कालीन घोटाळयांमध्ये तात्काळ प्रतिक्रियेची गरज असते तर प्रणयी फसवणुकीची सुरुवात ही प्रत्यक्ष फसवणुकीच्या आधी कित्येक महिन्यापासून झालेली असते. फसवणूक कोणत्या प्रकारची आहे यावर धोकादायक घटक निर्धारित होत असतात. कोणत्या प्रकारचा घोटाळा आहे व कोणत्या प्रकारच्या व्यक्तींना लक्ष केले जाणार आहे हे समजून घेतल्यास बळी पडणाऱ्या व्यक्तींना यापासून रोखणे शक्य आहे.

**इंटरनेटची भूमिका (The role of Internet) :**

व्यक्तीने स्वतःचे पैसे एखाद्या MMF मध्ये गुंतवण्याविषयी मन बनविण्यामध्ये इंटरनेटची भूमिका याविषयी अगदी थोडे अभ्यास झाल्याचे पहावयास मिळते. MMF च्या पुढाकारामध्ये व अंमलबजावणीमध्ये प्रामुख्याने इंटरनेटची भूमिका महत्त्वाची ठरते. ऑनलाइन डेटिंग रोमान्स स्कॅम यांचे अध्ययन करण्याकरिता Whitty (२०१३) यांनी walther's hypersonal theory आधार घेत संशोधन केले. तिच्यामते, अशाप्रकारच्या नातेसंबंधामध्ये फसवणूक करणारी व्यक्ती व बळी पडणारी व्यक्ती या दोहोंमध्ये एकतर्फी अशा hypersonal नात्याची निर्मिती होते. आपणास योग्य प्रणयी जोडीदार मिळाला आहे. या विश्वासाने व्यक्ती खोट्या व्यक्तीलाच आदर्शाच्या रूपात संवेदित करते. अशा प्रकारच्या फसवणूकीमध्ये इंटरनेटची भूमिका व त्यामध्ये सम्मिलीत होणाऱ्या विविध स्थिती Whitty यांनी स्पष्ट केल्या आहेत त्या स्थिती किंवा टप्पे पुढीलप्रमाणे:

## 4.3 ऑनलाईन प्रणयी फसवणुकीतील टप्पे (Stages involved in the Online dating romance scam) :

एखाद्या फसवणुकीमध्ये अथवा घोटाळयांमध्ये समाविष्ट असणारे टप्प्यांवर लक्ष केंद्रित केल्यास या घोटाळयांची रचना तसेच कार्यप्रणाली कशी असते याविषयीची महत्त्वाची माहिती अथवा अंतर्दृष्टी प्राप्त होईल. ऑनलाईन डेटिंग प्रणयी घोटाळे हे अनेक टप्प्यांमधून आकारास येतात असे संशोधनाअंती स्पष्ट झाले आहे. तसेच आर्थिक घोटाळयांकरिता अनेकविध पद्धती तसेच विविध माध्यमांचा वापर गुन्हेगारांकडून केला जात असल्याचेही स्पष्ट झाले आहे. हे टप्पे पुढीलप्रमाणे:

**टप्पा पहिला:** संभावित लक्ष्य व्यक्तीस आपणास आदर्श जोडीदार मिळावा यासाठी प्रेरित करावे लागते.

**टप्पा दुसरा:** संभावित लक्ष्य व्यक्तीला एक आदर्श स्थळ सुचवले जाते. सदरचे स्थळ फक्त तुमच्याकरिताच आहे याची खात्री दिली जाते.

**टप्पा तिसरा:** संभावित व्यक्तीचा विश्वास आणि प्रेम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो तसेच सदर व्यक्ती त्याकरता तयार आहे की नाही याची चाचपणी केली जाते.

**टप्पा चौथा:** येथे फूट-इन-द- डोअर अथवा तात्काळ अथवा निकडीची गरज अशा स्थितीची निर्मिती करून संभावित व्यक्तीस पैसे भरण्याविषयी मन वळवले जाते.

**टप्पा पाचवा:** घोटाळा सुरू राहण्याकरिता इतर काही अडचणीची निर्मिती केली जाते किंवा डोअर-इन-द-फेस सारख्या पद्धतीचा वापर केला जातो.

**टप्पा सहावा:** बळी पडलेल्या काही व्यक्तींना सदर घोटाळा पूर्ण झाल्याचे वाटते. तथापि त्यांना पुन्हा लक्ष्य केले जाते. इथे घोटाळा करणारे व्यक्ती मी तुम्हाला फसवत होते हे मान्य करते परंतु हे ही खरे आहे की यापूर्वी मी कोणाच्याही प्रेमात पडले नाही जेवढे प्रेम मी तुमच्यावर करते असे भासवून पुन्हा नव्याने पैशाची मागणी करते.

## 4.4 बेकायदेशीर डाउनलोड (Illegal Downloads) :

अनेक मोठ्या संगीत कंपन्यांसोबत बेकायदेशीरपणे संगीत डाऊनलोड करून देणाऱ्या विविध साधनांनी (ॲप्लिकेशन) आव्हान उभे केले आहे. अशा प्रकारच्या सॉफ्टवेअर व त्यामुळे होणाऱ्या नुकसानी विरोधात कायदेशीर दावे या कंपन्यांनी दाखल केले आहेत.

हे सॉफ्टवेअर अथवा ॲप्लिकेशन वापरकर्त्यांना गाणी शोधणे, पाहणे तसेच ते डाऊनलोड करण्याची सुविधा देतात. असे सॉफ्टवेअर विकसित करणाऱ्याच्या मते सदर ॲप्लिकेशन गाणी एकत्रित करण्याची संधी उपलब्ध करून देतात. तथापि कायदेशीरदृष्ट्या पाहता याचे स्रोत हे चौर्य करणाऱ्या साईड असतात.

आपण इथपर्यंत ज्या ज्या कृती पाहिल्या त्या सर्व गुन्हेगारी प्रकारच्या होत्या. यामध्ये अशा काही कृती आहेत ज्या ऑनलाईन करत असताना त्या बेकायदेशीर आहेत. याची जाणीव वापरकर्त्यास नसते. या कृती सर्वसामान्य आहेत. या कृती गुन्हे नाहीत असे त्यांना वाटत असते. या कृतीमध्ये कॉपीराइट असणारे साहित्य बेकायदेशीररित्या इंटरनेटवरून ऊनलोड करणे याचा समावेश होतो. या साहित्यामध्ये संगीत, पुस्तके, व्हिडिओज यांचा समावेश होतो. बेकायदेशीर डाऊनलोड करण्याविषयी वापरकर्त्यांमध्ये काही नैतिक विचार असल्याचे अभ्यासामधून स्पष्ट झाले. Hardy व सहकारी (२०१३) यांच्यामते, माहितीच्या देवाणघेवाणीची सेवा पुरवणाऱ्यांच्या मते लाखो व्यक्ती ह्या नैतिक दृष्ट्या हीन पातळीच्या असतात किंवा पारंपारिक धोक्याला (चोरी) समांतर म्हणून ऑनलाइन पायरीशी (चौर्य) मान्यता देण्याच्या विरोधात असतात. ऑनलाइन चौर्य करण्यामध्ये यांना काही गैर वाटत नाही.

ऑनलाईन डाऊनलोड अशा प्रकारच्या कृती या नैतिकदृष्ट्या चुकीच्या आहेत का, अशा प्रकारचे सायबरगुन्हे रोखण्याकरिता अपारंपरिक तसेच आधुनिक दृष्टिकोनाची गरज भासेल. पायरसी तसेच फाईल शेअरिंग यांमध्ये घट व्हावी याकरिता जाणीव जागृती व्हावी. तसेच शैक्षणिक कृती कार्यक्रमांच्या आठवणी करिता मोठ्या प्रमाणावर निधींची गुंतवणूक केली जात आहे. खरे पाहता अशा प्रकारच्या कृती कार्यक्रमामुळे व्यक्तीच्या वर्तनामध्ये तसेच बदलांमध्ये फार लक्षणीय बदल करण्यात अपयश आल्याचे दिसून येते. या कृती कार्यक्रमांमध्ये गुन्ह्याच्या पारंपारिक ऑफलाईन कृती आणि ऑनलाईन गुन्हे या दोहोंचा अंतर्भाव होतो. ऑनलाईन चोर्यच्या नकारात्मक परिणाम जसे दंड, तुरुंगवास यासारख्या गोष्टीकडे यामध्ये लक्ष वेधले जाते. National Crime Agency यांची संगीत संकेतस्थळावर बेकायदेशीर डाउनलोड विषयी धोक्याचा इशारा दिला आहे. यामध्ये बेकायदेशीर कृतीमध्ये सम्मिलित झाल्यास दहा वर्षाचा तुरुंगवास तसेच अमर्याद दंडाची तरतूद असल्याचे बजावले आहे. एवढे करूनही अंतिम वापर कर्ता असणाऱ्या ग्राहकांच्या वर्तनामध्ये फारसा फरक पडला नाही. हल्ली लंडन पोलिसांनी अशा संकेतस्थळावर बॅनरची जाहिरात प्रदर्शित केली. ज्यामध्ये चौर्य करणं गुन्हा असल्याचे दाखवले गेले. परंतु या नवीन पद्धती कितपत यशस्वी ठरल्या या विषयी पुरावे नाहीत.

पूर्वीच्या तंत्रामध्ये काही अडचणी अथवा समस्या असल्याचे दिसून येते. जसे बदलत्या वर्तनाचे मानसशास्त्र याविषयी अंतर्दृष्टीचा अभाव, अशा कृतीबाबत व्यक्ती धारित करीत असणारी व्यक्तिगत नीतिमूल्ये इ. संभावित शिक्षेविषयी भीती उत्पन्न केल्यास काही अंशी

पायबंद घालणे शक्य आहे. तथापि अतिरिक्त प्रमाणात भीती निर्माण केल्यास निर्माण होणारी चिंता टाळण्याकरिता अशा संदेशाकडे दुर्लक्ष केले जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे धूम्रपान विषयक मोहिमा होत. यामध्ये धुम्रपानाविषयी भीती निर्माण करणाऱ्या जाहिराती केल्या जातात. परंतु याचा फार अल्प परिणाम व्यक्ती वर्तनावर होत असल्याचे दिसते. पारंपारिक गुन्ह्यांच्या तुलनेत ऑनलाईन चौर्याविषयी वापरकर्त्यामध्ये विभिन्न नैतिक भूमिका असल्याचे पहावयास मिळते. याचबरोबर नियोजित वर्तन सिद्धांत (Theory of planned behavior) यानुसार एखादी गोष्ट ही सामाजिक मानदंड आहे अशी जेव्हा व्यक्तीचा विश्वास असतो. विशेषत: समवयस्क अशा प्रकारच्या कृतीमध्ये सहभागी होण्याची शक्यता अधिक असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पारंपारिक तसेच ऑनलाईन गुन्ह्याविषयी व्यक्तीचे नैतिक विचार कितीही कडक असले तरीही सामाजिक नियम हे शिथिल असल्याचे जेव्हा व्यक्तीच्या निदर्शनास येते तेव्हा व्यक्ती अशा कृतीमध्ये व्यस्त राहण्याची अधिक शक्यता असल्याचे hardy व सहकारी यांना आठळून आले.

एकंदरीतच ऑनलाईन चौर्य हा चित्तवेधक गुन्हा आहे जो कमी करण्याकरिता नवीन दृष्टिकोनाची गरज भासते. ऑनलाईन साहित्याच्या विक्रीकरिता अथवा खरेदीकरिता नवीन व्यावसायिक प्रतिरूपाची निर्मिती करण्याची गरज आहे. उदा. Magnatune ही कंपनी आपल्याला झालेल्या नफ्यातील निम्मी रक्कम कलाकारांना देते. तसेच PayPal द्वारे खरेदीस अधिक प्रमाणात सूट देवू करते. काही संशोधकांच्यामते, हा दृष्टिकोन डाउनलोडला प्रतिबंधक करण्यामध्ये काही अंशी यशस्वी ठरतो.

Magnatune कंपनीविषयी उपभोकत्याची (ग्राहकाची) अभिवृत्ती याविषयी Regner (२०१५) यांनी अध्ययन केले. याविषयी ते म्हणतात ऐच्छिक देयकावर आधारित प्रतिरूपाचे यशस्वी होण्याविषयी अधिक सखोल अध्ययन सुरू आहे. यासाठी असणारे अनेक प्रेरणात्मक घटकांची ओळख पटवण्यात यश प्राप्त झाले आहे. ही निर्धारके प्रथमक्षणी दिसायला वाजवी दिसतात. ज्यामध्ये प्रामाणिकपणा, पारस्परिक संबंध, स्व-प्रतिमाविषयक दृष्टीकोन, अ-अनुरूपता आणि डावपेच या सर्व घटकांचे एकत्रीकरण पहावयास मिळते.

**Suggested Activity:**

ऑनलाईन देयकाविषयीच्या नवीन दृष्टिकोनाविषयी विचार करा. बेकायदेशीर डाउनलोड थांबविण्याकरिता तुमच्या दृष्टीकोनाची मदत होईल असे तुम्हास वाटते का? असेल तर का अथवा नाही?